**माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निलंबन आदेश रद्द करणे व पुढील प्रशासकीय कारवाई स्थगित करण्याबाबत.**
(श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर, पंचायत समिती पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/१६७/909/२०२६
अहिल्यानगर दिनांक - 01/06/२०२६

वाचा - १. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६
२. महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०२५/प्र.क्र .१०/E Office No. १३३९०२०/कार्यासन-३, मुंबई,दि. ९ ऑक्टोबर २०२५
३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील वैदयकिय तपासणी अहवाल पत्र क्र.जि.रु.अ./दिव्यांग/प्र/पुनश्च/तपासणी/पडताळणी/६०३-०७/२०२६ दि. १४/०१/२०२६
४. इकडील कारणे दाखवा नोटिस जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१६७/६३/२०२६ दि. १०/०२/२०२६
५. गट विकास अधिकारी, पं. स. अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/२७६/२०२६ दि. २३/०२/२०२६
६. इकडील निलंबन आदेश जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१६७/११७/२०२६ दि. ११/०३/२०२६
७. मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका ८३४/२०२६ दि. ०७/०४/२०२६ रोजीचे आदेश
८. महाराष्ट्र शासन दिव्यांग समक्षीकरण विभाग यांचेकडील पत्र क्रमांक न्यायप्र-२०२६/प्र.क्र .०२/ कार्यासन-३, मुंबई, दि. ०८/०४/२०२६

उपरोक्त विषय व संदर्भ क्र. २ अन्वये राज्य शासनाच्या निर्देशानुसार दिव्यांग प्रमाणपत्र/वैश्विक ओळखपत्र (UDID) पडताळणी संदर्भातील कार्यवाहीअंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील संबंधित परिचर यांची पुनश्च वैद्यकीय तपासणी करण्यात येऊन संदर्भ क्र. ३ अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर अहवालानुसार **श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर** यांचे दिव्यांगत्व **अस्थिव्यंग ०%** इतके आढळून आलेले आहे. जे कोणत्याही लाभास पात्र नाही. सदर दिव्यांगत्वाच्या आधारावर नियुक्ती/बदली/सेवा जेष्ठता/ वाहन भत्ता/ आयकर सवलत ह्या सवलतीचा लाभ घेतला असल्याने शासनाच्या सुचनाच्या अधीन राहून संदर्भ क्र. ४ ते ६ अन्वये **श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर** यांना निलंबित करून, आर्थिक लाभाची वसुली करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

वरील प्रशासकीय कार्यवाही विरूद्ध संदर्भ क्र. ७ अन्वये मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केलेल्या याचिकेवर, मा. न्यायालयाने दि. ०७/०४/२०२६ रोजी न्यायनिर्णय पारित केला. सदर न्यायनिर्णयात रिट याचिकेतील परीच्छेद क्र. २ व ४ अन्वये सर्व संबंधितांचे निलंबन आदेशास स्थगिती देण्यात आलेली असून, वैद्यकीय तपासणीच्या निष्कर्षावरून कोणतीही तातडीची अथवा कठोर स्वरूपाची प्रशासकीय कारवाई न करण्याचे स्पष्टपणे निर्देशित केले आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मा. उच्च न्यायालयच्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार या कार्यालयामार्फत पूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र. ६ अन्वये देण्यात आलेला निलंबन आदेश व लाभाबाबत वसुलीची कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे. तसेच संबधित कर्मचारी यांनी दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे काही लाभ घेत असल्यास सदरचे लाभ तात्काळ बंद करणेची कार्यवाही करावी.

सबब मा. उच्च न्यायालयच्या आदेशाचे पालन करून श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर यांना पूर्वीचे कार्यालय प्रा. आ. कें. वाळकी, ता. अहिल्यानगर येथे परिचर पदावर पुनःस्थापित करणेत येत आहे.

श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. 202606010401 07 असा आहे.

(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी (भाप्रसे)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. अतुल तुकाराम सातपुते, परिचर, पंचायत समिती पारनेर
व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत:- १. मा. सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर
३. वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. कें. वाळकी, ता. अहिल्यानगर

२/- उक्त नमूद परिचर यांना हजर करून घ्यावे व पुढील आवश्यक ती कार्यवाही करून अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी (भाप्रसे)
जिल्हा परिषद अहिल्यानगर